## ऋणनिर्देश

संशोधनाचे काम चिकाटीचे आहे. माझ्या सारख्या आळशी माणसाचे ते खासच नव्हे. तरीही अनेकांच्या सहकार्यामुळे हे छोटेसे काम मी करु शकलो. यात अगदी यू.जी.सी. पासून विद्यापीठापर्यंत आणि श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेपासून ते महाविद्यालयापर्यंतचे अनेक घटक आहेत. मात्र सर्वांच्याच ऋणाचा स्पष्ट निर्देश करणे संशोधनाच्या शिस्तीस सोडून फारच अघळपघळ-पणाचे ठरेल. म्हणून काही मोजकी नावे, की ज्यांच्या ऋणांचा निर्देश करणे माझे प्रथम कर्तव्य ठरेल.

गुरुवर्य प्रा. डॉ. गो.मा. पवार यांनी फारच मोलाचे मार्गदर्शन केले. दोन्ही कवितासंग्रह त्यांनी अक्षरशः शिकवले-केले तर दिलाच, पण मुख्य म्हणजे विचारांना शिस्त लावली-यात जे चांगले आहे त्यात सरांचा वाटा खूपच मोठा आहे. त्यांना अजूनही काही करावे असे वाटत होते पण मीच कंटाळलो. त्यांच्या ऋणातून मुक्त होता येणार नाही.

आमचे मित्र प्रा. आ.ह. साळुंखे आणि विद्यापीठाच्या मराठी विभागातील प्रा. डॉ. ल.रा. नसिराबादकर, प्रा. रमेश ढावरे, प्रा. प्रभाकर पाटील यांचेही सहकार्य मोलाचे.

प्रा. हिंदुराव पाटील, प्रा. विष्णुपंत कदम, प्रा. गंगाधरपंत माळी, प्रा. सौ. मालती पाटील ह्या वर्गमित्रांचे आणि मराठी विभागातील सौ. सुप्रिया जोशी, सौ. मैंदर्गे, कु. विजया वाडकर, श्री. विष्णुपंत वासमकर, श्री. विष्णुपंत खाडे आणि श्री. तोरस्कर यांचाही या नामावलीत निर्देश करणे अगत्याचे.

प्रा. टी. आर. भोसले.